**Golden Research Thoughts**
**Vol -1 , ISSUE –3, September 2011**
**ISSN:- 2231-5063**
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# विशाल स्वराज्य निर्माते शिवरायांची पत्रे

**अनिल माणिकराव बैसाणे**

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

**प्रस्तावना :**

आजपर्यंतच्या भारतीय इतिहासात महाकवी, साहित्यिक लेखकांनी आपल्या कलाकृतीतून मोठमोठे नायक आदर्श म्हणून समजासमोर उभे केलेत असे असले तरी त्यांची ऐतिहासिकता वादग्रस्त आहे. मात्र शिवचरित्र हे जिवंत, वास्तव आणि तेजस्वी ऐतिहासिकतेने समृद्ध आहे. शिवचरित्राच्या अद्भूत घटनांच्या साक्षी देत शिवनेरी, प्रतापगड, रायगड आजही दिमाखाने उभे आहेत. पासलकर, मालुसरे, प्रभू घोरपडे, देशपांडे, जाधव, काकडे, जगताप, गुजर, मोहिते या घराण्यातील पूर्वजांच्या बलिदानाचा सार्थ अभिमान महाराष्ट्र बाळगत आहे. महाराष्ट्रात ज्ञानदेवांपासून ते तुकोबांपर्यंतच्या अनेक संतमहात्म्यांनी समतेची बीजे खोलवर रूजविणारी सामाजिक चळवळ चालविली, तर महाराजांनी राजकीय चळवळीचा सतांच्या समतेच्या चळवळीशी संगम घडवून स्वराज्य स्थपनेचे दुर्धर कार्य सिद्धीस नेले. काबूल ते बंगाल आणि काश्मीर ते कावेरीपर्यंत साम्राज्य असलेल्या 22 सुभ्यांचा व 50 कोटी महसुलाचा धनी असलेल्या शहेनशहा औरंगजेबाला शिवरायांची ही क्रांती मोडता तर आली नाही.[1] उलट महाराष्ट्राच्या मातीतच त्याला तादात्म्य व्हावे लागले. महान क्रांतीचे जनक अर्थातच ! महाराष्ट्र आणि मराठे होते.

**महाराजांची पत्रे व प्रकार**

शिवरायांचा पराक्रम, कर्तृत्व, त्यांची थोरवी, परधर्मसहिष्णुता, स्त्री पावित्र्य, रयतेचा राजा, राजनीती, शेतकऱ्यांविषयीचे धोरण, महसुलव्यवस्था, आर्थिक प्रशासकीय व न्यायविषयक धोरण, दिल्ली तख्त घेवून हिंदपदपातशाहीची स्थापना, जिझियाविषयीची जाणवी, अधिकाऱ्यांना अखंडित सावधानतेचा इशारा गृहकलहास विरोध, हिंदूचे ऐक्य, बदअंमल करणाऱ्यास शिक्षा, इत्यादी गुणांच्या मूल्यमापनासाठी उपलब्ध असलेली पत्रे फार महत्त्वाची आहेत. ही पत्रे अनेक ऐतिहासिक नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांचे संकलनाचे मोठे कार्य कै. डॉ. प्र. न. देशपांडे यांनी केले आहे. महाराजांच्या कार्य कर्तृत्वावरप्रकाश टाकणारी सुमारे 200 अस्सल व नक्कल पत्रे उपलब्ध आहेत. महाराजांची पत्रे आपल्या कारकुनांकडून लिहीली असून त्यांचे कचेरीपत्रे आणि खाजगी पत्रे असे दोन प्रकार पडतात. शिवरायांच्या कचेरीपत्रांमध्ये प्रारंभी ''अजरख्तखाने (कचेरीपासून) राजश्री शिवाजी राजे दामदौलत हुं'' (त्याचे राज्य चिरायू होवो) तर मध्यभागात वजानीबु (कडे) कारकुनानी हाल (हल्लीचे) व इस्तकबाल (पुढे होणारे) देशमुखनि' इत्यादि मजकूर आहे. या पत्रांमध्येही पुढे उपप्रकार आढळतात. इ.स.1674 मध्ये राज्यभिषेक झाल्यानंतर वरील मायनाऐवजी प्रारंभी 'स्वस्ति श्रीराज्यभिषेक शके' असा उल्लेख येऊ लागला. या पत्रांमध्ये महाराजांनी आपला उल्लेख 'क्षत्रिय–कलावंत श्री राजा शिवछत्रपती' असा उल्लेख केला. हाच शक पुढे 'राज शक' या संक्षिप्त नावाने रूढ झाला. असे असले तरी महाराजांनी 'सुहुर सन' (फारसी कालगणना) याचा उल्लेख पत्रलेखनामध्ये ठेवला.

शिक्का मोर्तब कागदपत्रे राज संमत झाले म्हणून ऐतिहासिक साधनांमध्ये महत्त्वाचे मानले जातात. शिक्का प्रारंभी व मोर्तब पत्राच्या शेवटी उमटविलेला असे. कचेरीपत्रांवर महाराजंची राजमुद्रा शिरोभागी तर आदरणीय साधुसंत व सहकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रांवर मागच्या बाजूला खाली उमटविली जात. पत्रलेखनाचे कार्य चिटणीस करीत असे.

पत्र क्र. 4 आणि पत्र क्र. 126 मधून स्त्री पावित्र्याची जाण व्यक्त होते. रांझे गावाचा पाटील बाबाजी भिकाजी गुर्जर याने गुणुच्या बहिणीवर अत्याचार केला म्हणून महाराजांनी हात–पाय तोडण्याची शिक्षा फर्मावली होती. तर बदअमल करणाऱ्या पदाजी यशवंतराव सिवतकर यांचे डोळे काढण्याची शिक्षा महाराजांनी दिली होती.[2]

135 क्रमांकांच्या पत्रात रयतेविषयी तळमळ व्यक्त करतांना म्हणतात की, ''तुम्ही जनतेला उपद्रव दिला तर मोगलांपेक्षाही आपणांस भयंकर मानतील, रात्रीची दिव्याची वात उंदिर नेईल तर गरीब कुणब्यांच्या शेतीची नासाडी होईल.'' तर 162 क्रमांकांच्या पत्रात रामाजी अनंत या प्रभानवल्लीच्या सुभेदारास म्हटले आहे. ''यौसियास चोरी न करावी, इमाने व इतबारे साहेब काम करावे, येक भाजीच्या देठास, तेही मन न दाखविता रास व दुरूस वर्तणे, रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभोग आपणास येईल ते करणे, रयतेवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत, येसे बरे समजणे, कष्ट करून गावागावात फिरावे'' तसेच स्वराज्यावर शायिस्तेखानाची स्वारी झाली तेव्हा महाराज काय म्हणतात ते पत्र क्र. 81 मधून

वाचावयास मिळते. 22 ऑक्टोबर 1662 रोजी रयतेच्या सुरक्षिततेची काळजी घेतांना आज्ञा करतात की, ''ये कामास है गै न करणे.... या कामास एक घडीचा दिरंग न करणे....तुम्ही आपले जागी हुशार असणे.....'' अशा महत्त्वाच्या तत्परतेच्या सूचना सर्जाराऊ जो यांना दिल्या आहेत. तर 71 क्रमांकाच्या पत्रात कान्होजी जेधे यांना आपल्या तब्येतीची काळजी घेण्याविषयी महाराज लिहितात की, औसध घेऊन शरीरासी आरोग्य होई ते करणे उपचाराचे विशी आलस न करणे....., यावरून महाराजांची आपल्या अधिकाऱ्यांवरील प्रेमाची आणि रयतेच्या हिताची जाणीव होते.[3]

महाराज हिंदुंच्या पवित्र स्थळांबरोबरच मुस्लिम पवित्र स्थळांचाही आदर करीत व त्यांच्या खर्चाकरिता इनाम देत. महाराजांनी आळंदी येथील ज्ञानदेवाच्या समाधीला तर सासवड येथील सोपानदेव समाधीला इनाम दिल्याचा उल्लेख पत्र क्र. 123 व 124 मध्ये वाचावयास मिळतो. तर 6 क्रमाकांच्या पत्रात मौजे कारीच्या काझी सईदला मशिदीच्या खर्चाकरिता इनाम दिल्याचा उल्लेख आहे. असेच पत्र 1647 चे प्रसिद्ध आहे. त्यातून मौजे भंबवडे, येथील मुलाअली अब्दुला यास मशिदीच्या खर्चासाठी इनाम दिल्याचा उल्लेख आहे. तसेच पत्र क्रमांक 55, 64, 109, 134 पाहिलीत तर अनुक्रमे इंदापूरच्या मशिदीसाठी दिवाबत्तीकरिता 1 चावर जमीन, 1669 मध्ये भांबोर्डे येथील मशिदीला इनाम, मौजे फुरसिंगी येथील मशिदीच्या खिजमती करिता इनाम देवून महाराजांनी व्यक्त केलेल्या धार्मिक आदराची तुलनाच करता येणार नाही. इ.स. 1657 मध्ये बादशहा औरंगजेबास पत्र लिहून हिंदूवर लादण्यात आलेल्या झिजीया कराचा महाराजांनी निषेध नोंदविला. त्यात महाराज म्हणतात की, 'अस्मानी किताब म्हणजे कुराण होय. ती ईश्वराची वाणी आहे. सर्व ईश्वर निर्मित आहे. कुठे मशीद आहे, त्याचे स्मरण करून बांग देतात, कोठे देवालय आहे तेथे घंटा वाजवतात.'' असे धार्मिक औदार्य शिवरायांचे होते.[4]

सप्टेंबर 1677 (पत्र क्र. 173) मध्ये पत्र पाठवून म्हणतात की, ''गृहकलह वाढवू नये, वाढलियाने पहिले युगी पांडव कौरव बहुत बहुत कस्टी जाले., ''आपल्यात आपण गृहकलह टाळण्याविषयी व्यंकोजी राजांना समाजावून सांगितले आहे. म्हणून शिवरायांच्या भूतकाळ स्मरणात होता, वर्तमानाचं वास्तव डोळ्यासमोर होते आणि याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे भविष्याच्या जाणीवा त्यांना होत्या.

शिवरायांची स्वराज्य स्थापनेची आणि ती देशभर विस्तारित करण्याची तळमळ, अपेक्षा याकरिता पुढील पत्रे महत्त्वाची ठरतात. पत्र क्रमांक 3 मध्ये दादाजी नरसप्रभू देशपांडे यांना आपला मनोदय कळविला आहे. श्री. रोहिडेश्वर यांनी आपणास यश दिले आहे. त्यात ''हिंदवी स्वराज्याची स्थापना'' आणि ''हे राज्य श्रींचे व्हावे'' हा मनोरथ पूर्ण करणार असल्याचा उल्लेख करतात, महाराजांना स्वराज्य आणि त्यातील प्रदेशांविषयी अभिमान वाटत असे. ज्यावेळी बादशहा हुकूम फर्मावित असे की, शिवाजीचे किल्ले व मुलुख काबीज करा. तेव्हा मोगल अधिकारी जाब देत आम्ही लौकरच काबीज करतो.[5] यावर महाराजांनी पत्र क्र. 83 मधील उल्लेखाप्रमाणे खडसावले की, '' आमच्या ह्या कठीण प्रदेशात नुसता कल्पनेचा घोडा सुद्धा नाचविणे अशक्य आहे. मग आमचा प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला ! भलत्याच खोट्या बातम्या बादशहाला कळविण्याची तुम्हाला लाज का वाटत नाही?'' पुढे महाराजांनी अफझलखान, शाहीस्तेखानाचे काय झाले हे सांगून आपल्या भूमीचे संरक्षण करणे माझे कर्तव्य आहे... मी आपले कर्तव्य बजावण्यास कधी चुकणार नाही. अशी ग्वाही देतात. आणि म्हणूनच सिंहगडावर फितुरी झाल्याची वार्ता कळल्यावर (2 एप्रिल 1663 रोजी) पत्र पाठवून (पत्र क्र. 82) मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार यांना ''अखडीत सावधान'' असा इशारा देतात.

महत्त्वाचे म्हणजे औरंगजेबाच्या वतीने चालून आलेल्या मिर्झा राजा जयसिंग यास हिंदवी स्वराज्याच्या ध्येयात सामील होवून भारतातून इस्लामी सत्तेच्या उच्चाटनासाठी कामी येण्याची समजही देतात. पत्र क्रमांक 87 चे इ.स. 1665 चे आहे त्यात शहाणपणाने वागण्याचा सल्ला महाराजांनी दिला होता. यात महाराजांची हिंदूपद प्रात बादशाहीची संकल्पना स्पष्ट होते. महाराज जयसिंगास म्हणतात की, ''तू स्वतःच्या मनाने आला असता तर, दक्षिण देश जिंकून देण्यास माझे शीर व डोळे तुझ्या रस्त्यावर बिछान्याप्रमाणे पसरवले असते.'' मात्र तू सज्जनांना फसविणाऱ्या औरंगजेबाच्या भुलथापांना बळी पडून येतो आहेस. लढावे तर हिंदुचीच हानी होईल म्हणून महाराज दुःख व्यक्त करतात. तो तुर्क आला असता तर आम्हा वीरांना घरबसल्या शिकार मिळाली असती. परंतु त्याच्यात आमचा मार सोसण्याचे सामर्थ्य नाही. पुढे महाराज जयसिंगास जाणीव करून देतात की, ''सिंहांनी आपसांत लढून घायाळ व श्रांत व्हावे आणि गिधाडांना जंगलाचे स्वामित्व प्राप्त व्हावे, अशी औरंगजेबाची इच्छा आहे. ही गुढ नीती तुझ्या ध्यानात येत नाही. आजवर किरकोळ शत्रूंशी गाठ पडल्यामुळे तुझा दम कायम राहिला आहे. परंतु आता सिंहाश्झी गाठ पडली आहे. अशी धमकीसुद्धा महाराजांनी जाणीव करून देत असताच जयसिंगाला भरली होती. पुढे महाराज जयसिंगाला महत्त्वाच्या जबाबदारीची जाणीव करून देतात की, तु राजा जसवंतसिंग व राणा जयसिंहाशी ऐक्य करून चारही बाजूंनी आपण सर्पाचे डोके ठेचून काढू. आम्ही विजापूर व गोवळकोंडा नष्ट करून तुम्हाला येऊन मिळतो आणि पाहता पाहता दिल्लीचे तख्त काबीज करू. या कामास हृदय व डोळे आणि हात यांचीच आवश्यकता आहे. तुझे माझे शत्रुत्व नाही, भीती न बाळगता भेट द्यावी म्हणजे खूप बोलता येईल. भेट नाकारली तर माझी तीक्ष्ण तलवार आहे व तुझी सेना आहे. उद्या माझी तलवार म्यानांतून बाहेर पडेल अशी शेवटी धमकीही भरली.[6]

सर्व हिंदू राजांना, सरदारांना एक आणून इस्लामी अत्याचारी व्यवस्थेला नष्ट करून हिंदवी स्वराज्य देशभर उभारण्याचा मनोदय महाराजांचा किती स्तुत्य होता. परंतु नादान जयसिंगाला कळला नाही हे दुर्दैव !

पुढे स्वतः बादशहा दक्षिणेच्या वाटेवर असता 164 क्रमांकाच्या पत्रात 28 जाने 1677 रोजी महाराज उपदेश करतात, ''हली यवन उत्तर देसीहून येत आहे. तरी सर्व ज्ञ्ज्ञतीने येक दिल राहून कस्ट मेहनत करून सरकारची सेवा करून शत्रू

पराभवाने न्यावा.'' यावरून हिंदुमधील सर्व जाती जमातीतील ऐक्य स्वराज्याकरिता महाराजांना किती आवश्यक होते याची प्रचिती येते.[7]

असा विशाल स्वराज्य निर्माता शिवराय त्यांच्या पत्रातून शोधण्याचा एक प्रयत्न ! प्रादेशिक विस्ताराने विशालता नसली तरी ध्येय, प्रयत्न, पराकाष्ठा आणि संकल्पना यादृष्टिने स्वराज्य विशालच होते.

शिवरायांना शतशः प्रणाम !

## संदर्भसूची

1. देशमुख विजय, ***शककर्ते शिवराय,*** छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर, 1984, पृ. 275.
2. देशपांडे डॉ. प्र. न., ***छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे,*** राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 2010, पृ. 208.
3. ***तत्रैव***, पृ. 147, 148.
4. ***तत्रैव,*** पृ. 259.
5. पवार डॉ. जयसिंगराव, ***शिवाजी व शिवकाल***, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2001, पृ. 309.
6. देशपांडे डॉ. प्र. न., ***उपरोक्त,*** पृ. 162, 164.
7. ***तत्रैव,*** पृ. 245–246.

**अनिल माणिकराव बैसाणे**
इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .